Historicity Research Journal
Volume 2 | Issue 10 | June 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# चले जाव चळवळीत जळगाव जिल्ह्यातील महिलांचा सहभाग

**इंदिरा अशोक लोखंडे [१] , के. डी. ढेकणे[२]**

[१]एम. फिल. संशोधक (इतिहास), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव .
[२]संशोधक मार्गदर्शक , नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव.

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत शोध निबंधात १९४२ चले जाव चळवळीत जळगाव जिल्ह्यातील महिलांनी घेतलेल्या सहभागाचा उल्लेख दिसून येतो. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीयांनी इंग्रजांविरूध्द १९४२ ला स्वातंत्र्यासाठीचा लढा पुकारलेला होता. भारतीय आता राष्ट्रप्रेमाने भारावलेले होतेच. ब्रिटीशांच्या प्रशासन व्यवस्थेकडून घडलेल्या, घडविलेल्या घडवून आणलेल्या काही घटना भारतीयांचा उद्रेक जागृत होण्यास सहाय्यकारी ठरलेल्या होत्या. गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतभर राष्ट्रवादाच्या, राष्ट्रप्रेमाच्या असीम ध्येयाने भारावलेल्या जनतेने स्वतःला ब्रिटीशांविरूध्दच्या लढयात झोकून दिलेले होते. प्रत्येक प्रांताप्रांतातील जिल्ह्याजिल्ह्यातून हा लढा तीव्रतेने लढला जाऊ लागला होता. मुंबई प्रातांतर्गत येणाऱ्या उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगाव या दोन जिल्ह्यात हा लढा खान्देशवासियांच्या जिद्द आणि जाज्वल्य राष्ट्र अभिमानामुळे प्रशंसा झालेला आपल्याला दिसून येतो. त्यातच खान्देशातील स्वातंत्र्य चळवळीत पुरूषांबरोबर स्त्रियांनी ही तेवढयाच जोमाने १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतलेली दिसून येते.

**लिलाबाई उत्तमराव पाटीलः-**

इ. स. १९४०-४१ सालच्या युध्द विरोधी वैयक्तिक सत्याग्रह सभेत भाषण केले. ह्याबद्दल त्यांना दिड महीना सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. तसेच इ. स. १९४२ सालच्या चलेजावच्या आंदोलनात अमळनेर येथे सभा मिरवणूकीत, जाळपोळ आणि मोडतोड कार्यात भाग घेतल्याबद्दल साडेपाच वर्षे सक्तमजूरीची शिक्षा भोगावी लागली होती. तसेच त्यांनी भूमिगत राहून बरेच कार्य केले.

**तुळसाबाई देवचंद वाढेः-**

इ. स. 1940-41 सालच्या युध्दविरोधी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे 1940 मध्ये देवगडच्या न्यायालयात एक दिवसाची साधी कैद आणि 50 रू. दंड अथवा सहा महिने शिक्षा झालेली होती. 50 रू. दंड न भरला गेल्यामुळे त्यांना परत सहा महिने शिक्षा भोगावी लागली होती. तसेच तुळसाबाईंनी 1942-43 मध्ये चले जाव आंदोलनात सहभाग घेतल्यामुळे जबलपूर येथे एक वर्ष स्थानबध्द ठेवण्यात आले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत तुळसाबाईंनी दिलेल्या योगदानाबद्दल शासनाने त्यांना सन्मानपत्र दिलेले दिसून येते.

**श्रीमती वत्सला गोविंद राणे :-**

वत्सलाताई रा. खिरोदा ता. रावेर यांचे शिक्षण इयत्ता चौथी पर्यंत झालेले होते. स्वातंत्र्य लढयात आमुचा सहभाग ह्या पुस्तकातील लेखात मिळालेल्या माहिती वरून......

वत्सलाताई राणे यांना स्वातंत्र्य लढयात उडी घेण्याची प्रेरणा जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक व काँग्रेस कार्यकर्ते श्री. लोटूभाई फेगडे यांच्याकडून मिळाली. श्री. लोटूभाऊ व त्यांच्या बरोबरच्याअनेक कार्यकर्त्यांनी रावेर, यावल तालुक्यातील सर्व गावे प्रभात फेऱ्या, सभा, मिरवणुकी इत्यादींनी पिंजून काढली होती. दादासाहेब चौधरी यांचीही प्रेरणा मिळाली. जनतेत स्वातंत्र्याचे वारे संचारले होते

वत्सलाताई राणे यांनी ही १९४२ च्या लढयात सक्रिय भाग घेतलेला दिसून येते. त्यांच्या बरोबर पाच स्त्रिया तयार केल्या. कमलबाई चौधरी, यशोदाबाई पाटील इतर दोन-तीन जणींनी पुरूषांप्रमाणेच प्रभात फेरी, मिरवणुकीचा कार्यक्रम सुरू केला. मिरवणुकीत सरकारी नियम पाळू नका. वंदे मातरम, महात्मा गांधीजी की जय, ब्रिटीशांनो चालते व्हा इत्यादी अनेक प्रकारच्या घोषणा १९४२ च्या लढयात वत्सला ताई व त्यांच्या सहमेत्रिणींना दिलेल्या दिसून येतात. त्यांचा जनजागृतीचा कार्यक्रम सावदा, रोझोदा, मस्कावद, चिनावल इत्यादी गावी करीत होते.

सन १९४२ चा स्वातंत्र्य लढयात कार्य करीत असतांना ब्रिटीश सरकारने त्यांना २३ एप्रिल १९४३ ते २७ मे १९४३ या मुदतीपर्यंत जळगाव लॉकरमध्ये वत्सलाताई यांना ठेवण्यात आले होते त्यांचा खटला चालला. कोर्ट उठेपर्यंत शिक्षा सुनावली. २७ मे १९४३ रोजी त्यांना जेलमधून सुटका झाली होती. अशी नोंद स्वातंत्र्य लढयातील माझा सहभाग याठिकाणी दिसून

**श्रीमती इंद्रायणी रावजी चौधरी :-**

श्रीमती इंद्रायणी रावजी चौधरी यांचा जन्म रोझोदे ता. रावेर येथे सन १९२४ साली झाला होता. स्वातंत्र्य सेनानी कै. लोटू इच्छाराम फेगडे यांची कन्या. राष्ट्रकार्याचे बाळकडू त्यांना त्यांच्या वडिलांपासूनच मिळाले. त्यांचे वडील सन १९३२ पासून स्वातंत्र्य लढयात सक्रिय होते. प्रभात फेऱ्या काढून जनजागृती करीत असतांना वडिलांना च्या सोबत इंद्रायणीताई या स्वातंत्र्य लढयातील कार्यात सहभाग दिसून येतो. त्यांच्या वडिलांनी स्वयंसेवक व स्वयंसेविकांची टोळीच तयार केली होती. श्री. इच्छाराम भाई, परशराम मनसाराम चौधरी, किसन परशराम चौधरी यांची नावे ते सांगतात, काही स्त्रियाही प्रभात फेरीत असत.

नालवाडी येथे पू. विनोबा भावे यांच्या आश्रमात इंद्रायणी चौधरी दोन वर्ष राहिल्या होत्या. त्या ठिकाणी राहून सुत कताई, सफाई, विणाई इत्यादी कामे केली होती. त्यानंतर सन १९४२ साली `चले जाव` चळवळीत वडिलांच्या बरोबरीने त्यांनी खेडोपाडी प्रचाराचे कार्य केलेले दिसून येतो. हा लढा ब्रिटीश साम्राज्यविरूध्द होता. वंदे मातरम प्रभात फेरी यांना बंदली होती. अशा नंदीच्या कालखंडात इंद्रायणी चौधरी यांनी प्रभात फेरी व वंदे मातरम या गीतांनी खेडोपाडी ही जनजागृती केलेले दिसून येते.

१९४२ च्या स्वातंत्र्य लढयात ब्रिटीश सरकारची धरपकड सुरू असतांना त्यांचे वडील व त्यांच्या टोळीतील लोक पकडले गेले व त्याच बरोबर इंद्रायणी चौधरी यांनाही पकडले गेले होते, त्यांच्यावर खटलाभरण्यात आला, त्यात त्यांना १ महिना चार दिवसांची शिक्षा व २५ रू. दंड अशी शिक्षा देण्यात आलेली होती. दि. २३ नोव्हेंबर १९४४ ते २७ डिसेंबर १९४४ पर्यंत शिक्षा भोगली त्यानंतर त्यांची सुटका झालेली होती. अशा प्रकारे वडिलांच्या पावलांना पाऊल टाकून, देशभक्ती, देशप्रेम, स्वातंत्र्याची ओढ मनात ठेऊन स्वातंत्र्य लढयात हिरीरीने कार्य करणाऱ्या इंद्रायणी चौधरी यांना महाराष्ट्र शासनाने या देशसेवेबद्दल सन्मान वेतन व सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव केलेला दिसून येतो. तसेच त्यांना महाराष्ट्र शासनाकडून दरमहा १५०० + १०० असे १६०० रू. पेन्शन मिळत आहे. अशी नोंद स्वातंत्र्य लढयातील माझा सहभाग ह्या लेखात नोंदविलेला दिसून येतो.

**विमलाबाई धनाजी चौधरी तथा विमलाबाई केदार खाचणे :-**

विमलाताई यांनी इ. स. 1942 सालच्या चले जावच्या चळवळीत सभा व मिरवणूकीत सहभाग घेतलेला दिसून येतो. या चळवळीत सहभाग घेतल्याबद्दल त्यांना भुसावळच्या न्यायालयात दिड महिना सक्त मजूरीची शिक्षा झालेली होती. तसेच इ. स. 1948-50 सालच्या जिल्हा स्कूल बोर्ड आणि इ. स. 1945-57 या कालखंडात भुसावळ म्युनिसिपल सभासद म्हणून त्यांनी काम पाहिलेले दिसून येते.

**मालतीबाई चित्तभूषण दास :-**

मालतीबाई यांनी इ. स. 1942 च्या चले जाव चळवळीत सक्रिय सहभाग घेतल्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला होता. पुरूलिया येथे आश्रमातून त्यांनी पुढील समाजसेवा केलेली दिसून येते.

**चिंधुताई केशवराव देवधर:-**

चिंधुताई यांचा जन्म भुसावळ ता. जळगाव या गावी झाला. त्यांचा जन्म इ. स. 1920 मध्ये झाला, त्यांचे शिक्षण इंटर ऑर्टस पर्यंत झालेले आहे. इ. स. 1942 च्या चले जाव चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविलेला होता. तसेच त्यांनी सभा व मिरवणुकीत भाग घेतलेला होता. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना 1 वर्षापर्यंत नागपूर जेलमध्ये विनाशिक्षा व खटला भरून त्यांना डांबून ठेवण्यात आले होते. चिंधुताईंनी 1942 च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभाग नोंदविल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांना सन्मानपत्र व दरमहा 200 रू. मानधन दिले होते.

**इंदिराबाई विश्वासराव पाटील:-**

इंदिराबाई यांचे मूळगाव जुबार्डी ता. पाचोरा हे होय. त्यांचे शिक्षण मराठी माध्यमातून सातव्या इयत्तेपर्यंत झालेले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढयात त्यांनी इ. स. 1942 सालच्या चले जाव चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविलेला दिसून येतो. त्यांनी भूमीगत राहून सांगली जिल्ह्यातील भूमिगत आंदोलनांच्या कार्यकर्त्यांना सहाय्य करून आश्रय दिलेला होता.

**वेणूताई गिरधर पाटील:-**

वेणूताई यांनी इ. स. 1942 सालच्या चले जाव चळवळीत भूमिगत आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना सहाय्य व आश्रय दिलेला होता. भूमिगतांना अशा प्रकारे सहकार्य करून त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतलेला दिसून येतो. तसेच इ. स. 1945 साली सभा व मिरवणूकीत भाग घेतला त्याबद्दल वेणुताई यांना सहा महिने सक्त मजूरीची शिक्षा भोगावी लागली होती. आणि त्यांचा मृत्यू इ. स. 1945 मध्ये झाला. त्यांनी केलेल्या ह्या सहकार्य, योगदान महत्त्वाचे मानले जाते.

**शांताबाई भार्गव फाटक:-**

शांताबाई फाटक यांचे जन्मगाव शिरसोली ता. जि. जळगाव हे होय. त्यांचा जन्म इ. स. 1922 मध्ये झाला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात इ. स. 1940 मध्ये भाषण देऊन समाजात जनजागृती करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. म्हणून त्यांना चार महिने व 50 रू. दंडाची शिक्षा हिंडलगा तुरूंगात शिक्षा भोगली लागली होती. इ. स. 1942 साली चले जाव आंदोलनात बुलेटिन्स वाटल्याबद्दल सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झालेली होती. तसेच इ. स. 1942 साली चले जाव आंदोलनात भाषण बंदीचा हुकूम मोडून भाषण केल्याबद्दल एक वर्ष सक्त मजूरीची शिक्षा व 100 रू. दंडाची शिक्षा ठाणे कारागृहात भोगावी लागली होती. महाराष्ट्र शासनाकडून त्यांनी केलेल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल मासिक 25 रू. दिले जात होते. त्यांचा मृत्यू 1964 मध्ये झालेला दिसून येतो.

**कौसल्याबाई चावदासभाऊ भोळे:-**

सन 1942 च्या चले जावच्या चळवळीत सर्वांनीच उत्स्फूर्त सहभाग नोंदविलेला होता. कौसल्याबाईंनी आश्रमातील सर्व भगिनींबरोबर 1942 च्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेला होता. त्यात त्यांनी वर्धा शहरात रोज मिरवणूका काढणे, ठिकठिकाणी सभा व मिरवणूका आयोजित करणे, बुलेटिन वाटणे इ. कामे करून त्यांनी शहरात स्वातंत्र्य चळवळींचा प्रचार व प्रसार केलेला दिसून येतो. हे कार्य करित असतांनाच त्यांना 1 वर्षासाठी अटक करण्यात आली होती. नंतर इंग्रज सरकारने त्याचे घर ही जप्त केलेल्यांची नोंद दिसून येते. कौसल्याबाई भोळे यांनी त्यांच्या पतीसोबत भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून सन्मानपत्र देण्यात आले होते.

**संदर्भ सूची :-**

1) डॉ. पाटील उत्तमराव क्रांतीपर्व पृ. 240

2) लेले. का. का आमचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग पृ. 168

3) वैद्यराज दादासाो भोगे जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्य पृ. 61-62
लढ्याच्या गत इतिहासाचे सिंहावलोकन केतकर कथा कथा स्वातंत्र्याची पृ. 278-79

4) डॉ. कुंटे भ. ग. स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश पृ. 221